अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि.१० जानेवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : ९२ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## मोहम्मद शामी अर्जुन पुरस्काराने सन्मानित

**नवी दिल्ली** : टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याला अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती भवनात त्याचा सन्मान करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते मोहम्मद शमी याला अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आले.

क्रिकेट विश्वात भारताचे नाव रोषण केल्यामुळे मोहम्मद शामी याचा अर्जुन पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. नुकत्याच झालेल्या विश्वचषकात मोहम्मद



शामी याने सर्वांनाच प्रभावित केले होते. दुखापत असतानाही मोहम्मद शामी याने दमदार कामगिरी केली होती. दरम्यान, आज राष्ट्रपती भवनात खेलरत्न पुरस्काराचं वितरण करण्यात आले. मोहम्मद शामी याच्यासह २६ जणांना अर्जुन पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. त्याशिवाय चिराग चंद्रशेखर शेट्टी (बॅडमिंटन) आणि रँकीरेड्डी सात्विक साई राज (बॅडमिंटन) यांना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले.शमीने यावर्षी भारताने आयोजित केलेल्या एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये चमकदार कामगिरी केली होती. यानंतर संधी मिळताच त्याने कहर केला. शमीने स्पर्धेत ७ सामने खेळले, ज्यात त्याने सर्वाधिक २४ विकेट घेतल्या.

## भवितव्याचा आज फैसला...

# खुर्ची टिकणार की मोडून पडणार | आता तरी दैवाची साथ मिळेल का?





### कसली धाकधूक...


मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा निकाल आमच्याच बाजूने लागणार,असा आत्मविश्वास व्यक्त केला आहे.निकाल विरोधात गेला तरी काहीही फरक पडणार नाही,असेही शिंदे म्हणाले. दरम्यान संभाजी नगरमध्ये पत्रकारांनी बुधवारच्या निर्णयाकडे लक्ष वेधल्यानंतर शिंदे गटाचे आ.संजय शिरसाट म्हणाले,कसली धाकधुक. धाकधुक वैगेरे काही नाही.पक्षांतर बंदी कायद्याचे शेड्यूल १० आम्हाला लागून होत नाही.आम्ही पक्षांतर केलेले नाही.आम्ही कायदेशीर बाबी पूर्ण केलेल्या आहेत.तेव्हा निकाल आमच्याच बाजून लागेल,असे भाकित वर्तवले.

**जर अपात्र ठरले तर... :** हा निकाल कोणत्या बाजूने लागेल आणि पुढची प्रक्रीया काय असेल यावर आज ज्येष्ठ विधिज्ञ, कायदेतज्ज्ञ उल्हास बापट यांनी भाष्य केले आहे.'विधानसभा अध्यक्ष एका भूमिकेमध्ये बसले आहेत, त्यांनी माध्यमांसमोर बोलायचे नसते. जज कधीच माध्यमांसमोर बोलत नाही. त्यामुळे निर्णय काय येईल हे मी सांगू शकत नाही. कायद्या प्रमाणे मी सांगत आलोय की दोन तृतांश लोक गेली पाहिजेत तस झाले नाहीतर अपात्र होतात. हे एका महिन्यात व्हायला पाहिजे होते. निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बाजूने लागला तरी सुप्रीम कोर्टात जाता येते, पण त्यासाठी आणखी तीन महिने लागतील, पण तीन महिन्यांनी निवडणुका येतील. त्यामुळे अंतिम निर्णय जनताच देईल,असे त्यांनी बापट म्हणाले.

**...तर सरकार पडू शकते :** 'हा निकाल जर एकनाथ शिंदे यांच्या विरोधात गेला तर त्यांना मुख्यमंत्री पदावर राहता येणार नाही. तसे झाले तर सरकार पडते. हे सरकार पडल्यानंतर राज्यपाल दुसऱ्या कोणत्या पक्षाला बहुमत आहे का याची तपासणी करतात. तसे असेल किंवा कोणालाच बहुमत नसेल तर राष्ट्रपती राजवट लावू शकतात. जो निर्णय दोन महिन्यात द्यायला पाहिजे होता त्या निर्णयसाठी दिड वर्षे लावले म्हणजे हा वेळकाढूपणा सुरू असल्याचे भाष्य बापट यांनी केले.

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटातील त्या सोळा आमदारांच्या अपात्रतेवर झालेल्या सुनावणीचा फैसला आज बुधवारी होणार आहे.सभापती राहुल नार्वेकर यांना सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार निर्णय देणे बंधनकारक आहे. त्यामुळे शिंदे यांची मुख्यमंत्रीपदाची खुर्ची टिकणार की मोडून पडणार याविषयी राज्यात उत्सुकता निर्माण झाली आहे तसेच निकाल आपल्या बाजूने लागणार की विरोधात लागेल, याची धास्ती उद्धव ठाकरे गटाला लागून आहे. निकाल देण्याच्या पूर्वसंध्येला म्हणजेच मंगळवारी निकाल आमच्याच बाजूने लागणार, असा आत्मविश्वास शिंदे गटाकडून व्यक्त केला गेलाय तर सभापतींच्या निर्णयात लोकशाहीचा खून होतो की विजय? हे पाहूनच पुढचा निर्णय घेवून असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.सभापतींच्या निर्णयातून राज्याला स्थर्य मिळणार की अस्थिरतेची गदा कोसळणार हाही प्रश्न ऐरणीवर आला आहे.**




### मिलीभगत तर नाही ना?

तर हा खटला वैयक्तिक नसून देशात पुढे लोकशाही राहणार आहे की नाही. हे दोघे मिळून लोकशाहीचा खून करणार आहेत हे आजच्या निर्णयावरून कळेल. मी मुख्यमंत्री होतो. कधीही विधानसभा अध्यक्ष मुख्यमंत्र्यांकडे जात नाही तर अध्यक्ष मुख्यमंत्र्यांना बोलावून घेऊ शकतात. परंतु हे दोघे फक्त मुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्ष नाहीत. एक न्यायाधीश आहे तर दुसरे आरोपी आहेत. मग न्यायाधीश ज्यांच्यावर आरोप आहेत, त्यांना भेटू शकतात का? यातून संशय येतो की या दोघांची मिलीभगत तर नाही ना.. असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला आहे.

**पवार-ठाकरे कडाडले :** आमदार अपात्रतेबाबत १० जानेवारीपर्यंत विधानसभा अध्यक्षांना निर्णय सुनावण्याची मुदत आहे. ठाकरे गट आणि शिंदे गट या दोन्ही आमदारांची सुनावणी विधानसभा अध्यक्षांकडे पूर्ण झाली असून आता सर्वांचे लक्ष निकालाकडे लागले आहे. त्यातच अलीकडेच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी यावर आक्षेप घेत ज्यांच्याकडून निकालाची अपेक्षा आहे, त्यांनीच ज्यांच्यावर सुनावणी सुरू आहे त्यांची भेट घेणे हे संशयास्पद आहे, असे पवारांनी म्हटले आहे.

ज्यांच्यापुढे प्रकरण आहे आणि ज्यांची केस आहे. ती केस मांडणे चुकीचे नाही. परंतु ज्यांच्यासमोर केस मांडली आहे आणि ज्यांच्याकडून निकाल अपेक्षित आहे. त्यांनी ज्यांची केस आहे त्यांच्याकडे जात असतील तर संशयाला चिंता वाटावी, अशी परिस्थिती निर्माण होते. हे केले नसते तर या पदाची प्रतिष्ठा आणखी चांगली राहिली असती असेही त्यांनी मुंबईत बोलताना नमूद केले. आम्ही सुप्रीम कोर्टासमोर प्रतिज्ञापत्र दाखल केलंय. त्यात एकदा नव्हे तर दोनदा मुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्ष यांची भेट झाली हे सांगितलं आहे. जनतेच्या कोर्टात आम्ही जातोय. जनतेचा अधिकार कुणी हिसकावून घेऊ शकत नाही. मागील २ वर्षापासून हा खटला चालतोय. घटनातज्ज्ञांची प्रतिक्रिया जनतेने पाहावी. इतका वेळ यात बर्बाद झाला. बेकायदेशीर सरकारच्या हातात राज्याचे भवितव्य आहेत हे धोक्याचे आहे. आज काय होणार याबाबत निकालातून दिसेल असेही ठाकरे म्हणाले.



## महिलेचे ७० हजारांची मंगळसूत्र पळविले

सुराज्य/मंगळवेढा

बसमध्ये प्रवेश करताना गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने एका महिलेच्या गळ्यातील ७० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र शिताफिने पळविले.

ही चोरी मंगळवेढा बस स्थानकात सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. यासंदर्भात सुशीला रवींद्र शिंदे (रा. मंगळवेढा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्या काल दुपारी बस स्थानकात सोलापूर ते सांगोल्याकडे जाणाऱ्या बस मध्ये प्रवेश करीत होत्या. त्यावेळी चोरट्याने त्यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र पळविले. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार खंडागळे पुढील तपास करीत आहे.

## मोडनिंब-टेंभुर्णीमध्ये एटीएम फोडून तेरा लाखांची रक्कम पळवली

सुराज्य/टेंभुर्णी

टेंभुर्णी पोलीस स्टेशन हद्दीतील मोडनिंब मधील एक आणि टेंभुर्णी शहरातील लोकवस्तीत रस्त्यालगत असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाचे दोन एटीएस मशीन चार जणाच्या टोळीने कॅमेरा वर काळा स्प्रे मारून गॅस कटरच्या सहाय्याने कट करून १२ लाख ८१ हजाराची धाडसी चोरी केली आहे तर टेंभुर्णी शहरातील लोकवस्तीत रस्त्यालगत असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न फसला आहे.

ही चोरी भरवस्तीतच झाल्याने टेंभुर्णी पोलिसांचे कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.या घटनेमुळे परिसरातील व्यापाऱ्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मोडनिंब ता.माढा येथे दि.९ रोजी पहाटे चारचे सुमारास स्टेशन रोडवरच्या स्टेट बँक ऑफ इंडियाचे एटीएम काळ्या रंगाचा स्प्रे मारून २०ते ३० वयोगटातील चार चोरट्याने पांढऱ्या रंगाचे क्रेटा टाईप कार गाडीतून आलेल्या अनोळखी चोरट्यांनी गॅस कटरने ए टी एम मशीन कापून काढून त्यामधील जवळपास १२८०८०० रुपये (बारा लाख ऐंशी हजार आठशे) हजाराची रोख रक्कम मशीनमधील ड्रायव्हरसह चोरून नेली आहे. तर टेंभुर्णी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील टेंभुर्णी



ते सोलापूर जाणारे रोडलगत असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा टेंभुर्णीचे असलेले एटीएमवर पहाटे सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास काळ्या रंगाचा स्प्रे मारून चोरट्यांनी गॅस कटरने एटीएम मशीन कापून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु तो फसला. परंतु मोडनिंबमधील जवळपास १२८०८०० हजाराची रोख रक्कम मशीनमधील ड्रायव्हरसह चोरून नेली आहे.अशी फिर्याद किरण संजय लांडगे यांनी दिली असून अज्ञात चार चोरट्याविरुद्ध कलम ३८०,३४,५११ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोनटक्के करत आहेत.

## साईबाबांना २९ लाखांचा सुवर्ण मुकुट अर्पण

**शिर्डी** : बंगळुरू येथील एका भक्ताने साईबाबांना २९ लाख रुपयांचा सोन्याचा मुकुट अर्पण केला आहे. या मुकूटावर सुंदर नक्षीकाम करण्यात आले असून त्याचे वजन ५०४ ग्रॅम इतके आहे.

सबका मालिक एक आणि श्रध्दा सबुरींचा संदेश देणाऱ्या साईबाबांच्या दरबारात देश विदेशातील साई भक्त भरभरुन दान करतात. मंगळवारी बंगळुरू येथील साईभक्ताने साईबाबांना तब्बल अर्धा किलो वजनी २९ लाख रूपयांचा सोन्याचा मुकूट अर्पण केला आहे. ५०४ ग्रॅम वजन असलेल्या या सुवर्ण मुकूटावर सुंदर नक्षीकाम केलेले असून ते आकर्षण ठरत आहे. साईबाबांना भक्त भरभरून दान देत असतात रोख देणगीबरोबरच सोन्या चांदीचे मोठ्या प्रमाणात दान मिळत असते. नवीन वर्षाच्या निमित्ताने शिर्डीत आलेल्या भक्तांनी १० दिवसांत १६ कोटींचे दान दिलाय. आज बेंगळुरू येथील साईभक्त



डॉ. राजाराम कोटा यांनी ५०४ ग्रॅम वजनाचा २९ लाख रूपये किमतीचा सोन्याचा मुकुट साईबाबांना अर्पण केलाय. साईमंदिराचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुळवले यांच्याकडे भक्ताने मुकूट सुपूर्द केल्यानंतर साईबाबांच्या मुर्तीवर तो चढवण्यात आलाय. यावेळी संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी हुळवळे यांनी कोटा परिवाराचा साईबाबांची मूर्ती देऊन सत्कार केलाय.

## देगाव येथे कोयत्याने मारहाण तरुण जखमी

**सोलापूर** : सांडपाण्याचा कारणावरून कोयता पाईप, दगडाने केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला ही घटना देगाव तालुका उत्तर सोलापूर येथे मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. अजय जगतापुरे (रा.देगाव) असे जखमीचे नाव आहे. दुपारी चार वाजेच्या सुमारास त्याला पंडित शिराळे त्याचा भाऊ गणेश शिराळे आणि इतर चौघांनी मिळून मारहाण केली.

## अक्कलकोटच्या तरुणाला ६० लाखास गंडविले

### निर्वाना डिझीटलवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

आमच्या कंपनीत आर्थिक गुंतवणूक केल्यास भरपूर नफा मिळवून देतो अशी ऑनलाईन थाप मरून अक्कलकोट तालुक्यातील एका तरुणाला ६० लाखात गंडविण्यात आले.

ही घटना ३ जानेवारी रोजी उघडकीस आली. यासंदर्भात गुरुशांत नागनाथ कळवंडी (वय २७ रा.चिंचोळी ता.अक्कलकोट) यांनी अक्कलकोट दक्षिण पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी निर्वाणा डिजिटल स्टुडिओ, मुंबई याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. गुरुशांत कळवंडी यांचे बी.टेक शिक्षण झाले आहे. ७ डिसेंबर रोजी त्यांना फोनवरून संपर्क साधून एका इसमाने आमच्या निर्वाणा कंपनीत पैसे गुंतवल्यास तुम्हाला भरपूर फायदा होतो असे सांगितले. त्याप्रमाणे सुरुवातीला कळवंडी यांनी पैसे गुंतवले आणि त्यांना आर्थिक फायदाही झाला. त्यानंतर कंपनीकडील इसमाने टेलिग्राम आणि मोबाईलवर संपर्क साधून त्यांना कंपनीच्या विविध शाखेच्या बँक अकाउंट मध्ये पैसे भरण्यास सांगितले. त्याप्रमाणे कळवंडी यांनी एकूण ६० लाख १९ हजार रुपये भरले. त्यानंतर कंपनीने संपर्क बंद केले . आपली फसवणूक झाल्याचे समजल्यानंतर त्यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तू ही त्या' राजकारण्यांप्रमाणे वागतोय !


कल्याण
112-42-138

मुंबई
390-21-560


## घरफोडी, मोटारसायकल चोरी, जबरी चोरीचे सात गुन्हे उघडकीस; पाच लाख रुपयांचा ऐवज जप्त

सुराज्य/सोलापूर

**पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील विजापूर नाका, सलगर वस्ती, सदर बझार आणि जोडभावी पेठ पोलीस आणि सोलापूर ग्रामीण कडील मोहोळ पोलीस ठाण्याकडे दाखल असलेल्या घरफोडी, जबरी चोरी आणि मोटरसायकल चोरीचे सात गुन्ह्यांचा उकल करण्यात शहर गुन्हे शाखेला यश आले आहे.त्यात सरकारी किंमतीनुसार जवळपास पाच लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला असल्याचे शहर पोलिसांनी सांगितले.**



डोणगांव रस्त्यावरील आर्यन पॅराडाईज मध्ये ५ ऑक्टोबर २०२३ रोजी एक वयस्कर महिलेस घरात मारहाण करून तिच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने ओढून नेले होते. १३ डिसेंबर २०२३ रोजी विजय नगरातील घरफोडी प्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्याकडे गुन्हा दाखल होता.१ जानेवारी २०२४ रोजी सर्वसुखी नगरात झालेल्या घरफोडी प्रकरणी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरिक्षक संजय क्षीरसागर व त्यांचे पथकाने ओंकार श्रीकांत जाधव (वय-२१, रा. सेटलमेंट फ्रि-कॉलनी नं-४, सोलापूर) यास ५ जानेवारी रोजी ताब्यात घेतले.त्याच्या अंगझडतीत,३ गुन्ह्यातील एकूण ४७.७५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल असा ३,४६,५०० रूपये किंमतीचा मुद्देमाल, तपास पथकातील पोलीस अंमलदार अनिल जाधव, राजु मुदगल, महेश शिंदे, कुमार शेळके, शिला काळे, ज्योती लंगोटे, सुमित्रा बारबोले, प्रकाश गायकवाड, अविनाश पाटील यांनी हस्तगत केला.

४ जानेवारी रोजी सपोनि श्रीनाथ महाडीक यांच्या पथकाने, शिवाजी वसंत राऊत (वय ३२, रा.कल्याण नगर, भाग-०३, जुळे सोलापूर) यास ताब्यात घेऊन, त्याची कसून चौकशी केली असता, त्याच्याकडून १) जोडभावी पेठ, मोहोळ पोलीस ठाणे (सोलापूर ग्रामीण) असे २ गुन्ह्यातील ५० हजार रूपये किंमतीच्या दोन मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकिस आले.ही कामगिरी सहाय्यक पोलीस निरिक्षक श्रीनाथ महाडिक व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार भोसले, शैलेश बुगड,अभिजित धायगुडे,राजकुमार वाघमारे यांनी केली. ०२ जानेवारी रोजी सहाय्यक पोलीस निरिक्षक विजय पाटील यांचे तपास पथकाने,सराईत गुन्हेगार आदित्य बसवराज दोडमनी ऊर्फ पोत्या यास शिताफीने ताब्यात घेतले.त्याच्या ताब्यातून दाखल गुन्ह्यातील ६० हजार रूपये किंमतीच्या चोरींच्या ०२ मोटार सायकली जप्त केल्या.ही कामगिरी विजय पाटील व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार राहुल तोगे, आबाजी सावळे, विठ्ठल यलमार, धीरज सातपुते यांनी केली.